# “ अमृतवाहिनी परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा ”

प्रिय पालक,

सप्रेम नमस्कार वि. वि.

या पत्राच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना आम्हास अतिशय आनंद होत आहे.

मा. आमदार श्री. बाळासाहेब थोरात साहेब यांच्या नेतृत्वाखाली आम्ही अभियांत्रिकी शिक्षणात मागील काही वर्षामध्ये वैविध्यपूर्ण विकास करून एक मानाचे स्थान निर्माण केले आहे. वसतिगृहातील सर्व मुले व मुलीना अगदी घरा सारखे वातावरण निर्माण करून त्यांना चांगले शिक्षण घेण्यास प्रोत्साहीत केले जाते. शिस्तबद्ध व सर्वांगीण शैक्षणिक विकासाचे वातावरण असलेला परिसर विकसित करण्यात आम्हास यश प्राप्त झाले आहे.

आपणासमोर आम्ही खालील काही वैशिष्टे मांडत आहोत –





### वसतिगृहे:-

मुलांचे वसतिगृह

1. सिंहगड – ५८४ प्रवेश क्षमता
2. सज्जनगड – ४८० प्रवेश क्षमता

मुलींचे वसतिगृह

1. कळसुबाई – ३८४ प्रवेश क्षमता
2. कृष्णावंती – २८८ प्रवेश क्षमता

प्रत्येक खोलीमध्ये चार विद्यार्थी. प्रत्येकाला स्वतंत्र बेड , टेबल , खुर्ची व कपाट अशी व्यवस्था.







### पाणी पुरवठा

1. पिण्याचे पाणी
   - TDS नियंत्रित २४ तास RO प्रक्रिया केलेले पाणी
2. अन्य वापरासाठी
   - आंघोळीसाठी सौर ऊर्जेद्वारे व गीझरद्वारे गरम पाण्याची उपलब्धता तसेच इतर वापरासाठी मुबलक पाणी पुरवठा.

### वैद्यकीय सुविधा

१. २४ तास रुग्णवाहिका

२. तात्काळ वैद्कीय खर्चासाठी रू. १० हजार सुरक्षा गेटवर उपलब्ध

३. वसतिगृहात दररोज सायंकाळी ५:०० ते ७:०० डॉक्टर उपलब्ध

४. मुलींसाठी निष्णात महिला स्त्रीरोगतज्ज्ञ

केवळ अत्यंत आणीबाणीच्या काळातच पालकांना बोलविण्यात येते. इतर वेळेला शिक्षकच विद्यार्थ्यांची काळजी घेतात.









### अखंडित वीजपुरवठा

१. २४ X ७ वीजपुरवठा

२. २६३ KVA क्षमतेच्या जनरेटरची पर्यायी व्यवस्था

३. १०० KW सौर उर्जेचा पहिला टप्पा कार्यान्वित

## इंटरनेट सुविधा

१. २४ तास इंटरनेट सुविधा
२. wi-fi कॅम्पस

मुलींसाठी मुलींच्या वसतिगृहातच स्वतंत्र संगणक कक्ष.







## वाचनालय व ग्रंथालय

१. ६२ हजार संदर्भ, क्रमिक ग्रंथ, पाठ्यपुस्तके असलेले अहमदनगर व नाशिक विभागातील सर्वात मोठे ग्रंथालय
२. मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र रात्रीच्या अभ्यासिकेची सोय.

सर्व लेखनप्रकाराची पुस्तके तसेच इंग्रजी, मराठी, हिंदी भाषिक वृत्तपत्रे व नियतकालिके यांनी परिपूर्ण असे वाचनालय

## व्यायामशाळा

१. विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शारीरिक, मानसिक व आरोग्य विकासाकरिता स्वतंत्र व्यायामशाळांची उपलब्धता.
२. विविध खेळांसाठी दोन विस्तीर्ण व भव्य क्रीडांगणे

तज्ज्ञ व अनुभवी क्रीडा मार्गदर्शक व स्वतंत्र महिला प्रशिक्षक.








## मनोरंजन

१. प्रत्येक वसतिगृहात दूरदर्शन संच
२. प्रत्येक शनिवारी चित्रपट दाखविण्यात येतो.

## Shopping सेंटर

१. दैनंदिन वापराच्या वस्तूंसाठी पुस्तक, स्टेशनरी व जनरल स्टोअर्स.

## सुरक्षा

१. २४ तास सुरक्षा रक्षकत वॉकी-टॉकी सह तैनात
२. संपूर्ण कॅम्पस CCTV च्या निगराणीच्या कक्षेत

विद्यार्थ्यांची दररोज BIOMETRIC पद्धतीने उपस्थितीची नोंद व तातडीच्या सुरक्षेसाठी अलार्म सुविधा.





## स्वच्छ व हरित परिसर

१. प्रत्येक वसतिगृहाच्या परिसरात स्वच्छ व सुंदर बगीचा
२. हिरवळ व फुलझाडांमुळे प्रसन्नतेत अधिकच भर
३. दररोज सकाळी व सायंकाळी वसतिगृह स्वच्छता
४. "स्वच्छ व सुंदर रूम " संकल्पना
५. रोख रु. १०००/-, ७५०/- व ५००/- चे अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसरे पारितोषिक
६. संपूर्ण कॅम्पसमध्ये डास प्रतिबंधक औषधांची फवारणी





### उपहारगृहे व खानावळी

१. कॅम्पसमध्ये ५ उपहारगृहे व खानावळी कार्यरत आहेत.
२. विविध प्रकारच्या खाद्य संस्कृतींचा संगम असलेले उत्तम अल्पोपहार व जेवणाची सुविधा

वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालाच्या तसेच तयार करण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांच्या दर्जाची व गुणवत्तेची वरिष्ठ अधिकाऱ्याद्वारे वेळोवेळी तपासणी.

### कोरोना चा वाढता प्रादूर्भाव लक्षात घेता खालील उपाय योजना केल्या आहेत

या कोरोना च्या कठीण प्रसंगी आम्ही विद्यार्थ्यांची पूर्ण काळजी घेत आहोत. त्या करिता आम्ही खलील उपाय योजना केलेल्या आहेत

१. प्रत्येक विद्यार्थ्यांची हॉस्टेल गेट वर थर्मल स्कॅनिंग व ऑक्सिजन सॅच्युरेशन चेक करण्याची वेवस्था केलेली आहे

२. प्रत्येक हॉस्टेल मधे सानिटीझर मशिन्स बसवण्यात आल्या आहेत.

३. प्रत्येक हॉस्टेल ऑफिस ला ultra violet scanning मशीन ची वेवस्था केली आहे.

४. सर्व हॉस्टेल मधील थंब बायोमेट्रिक अटेन्डन्स फेस रीडर ने रिप्लेस करत आहोत जेणे करून अटेन्डन्स हि घेता येईल आणि कोरोना चा प्रादुर्भाव हि कमी करता येईल.

५. आवश्यकता भासल्यास कोरोना संशयित विद्यार्थाना वेगळे ठेवण्यासाठी आम्ही कोरांटीन सेंटर तयार करत आहोत.

६. कोरोना चा प्रादुर्भाव लक्षात घेता हॉस्टेल मधील बाथरूम, संडास व पॅसेज ची साफ सफाई दिवसातून चार वेळा करण्याचे ठरवले आहे.

७. हॉस्टेल व परिसर रोज च्या रोज सानिटीज करण्याचे ठरवले आहे.



CET-२०२० ची ऑनलाईन परीक्षा सुरक्षित सोशिअल डिस्टंसिन्ग सह देताना १२ वी चे विद्यार्थी (Language Lab)



CET-२०२० ची ऑनलाईन परीक्षा सुरक्षित सोशिअल डिस्टंसिन्ग सह देताना १२ वी चे विद्यार्थी (CCF Lab)



हॉस्टेल मधील स्टाफ UV मशीन मधे पेपर्स सानिटीज करताना



विद्यार्थ्यांचे व स्टाफ चे थर्मल स्कॅनिंग करताना सेक्यूरीटी स्टाफ.



मेन गेट वर विद्यार्थ्यांचे ऑक्सिजन सॅच्युरेशन चेक करताना स्टाफ.



BA-२०२० ची ऑफलाईन परीक्षा सुरक्षित सोशिअल डिस्टंसिन्ग सह देताना BA चे विद्यार्थी (क्लास रूम)

## ठळक बाबी :



वसतिगृहातील मुली Bad-Minton खेळताना




अतिथी कॅन्टीन



वसतिगृहातील मुले Football खेळताना



वसतिगृहातील मुली Basket ball खेळताना



बांबू टनेल



४०० KW सौर उर्जेचा प्रकल्प यशस्वीरीत्या कार्यान्वित

वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थांना मिळणाऱ्या सर्व सोयी, येथील प्रसन्न वातावरण, स्वयंविकासासाठी उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा व प्राध्यापकांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन यामुळे त्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मोलाची मदत होते. **वसतिगृहातील विद्यार्थी वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा कॅम्पस इंटरव्हूमध्ये नेहमीच सरस ठरतात**. त्यांना आकर्षक नोकरीच्या चांगल्या संधी अधिक सहजासहजी उपलब्ध होतात, असा अनुभव आहे. असे निदर्शनास आले आहे कि , विद्यार्थी ब-याच वेळेला पालकांच्या संमतीशिवाय व महाविद्यालयाच्या माहितीशिवाय बाहेर खोली घेऊन किंवा खाजगी वसतिगृहात राहतात. तेथे कदाचित ते धुम्रपान, नशापान, दारू इत्यादी व्यसनांच्या आहारी जाऊ शकतात व त्याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होऊ शकतो. नेहमी अशा घटना आपल्याला वृत्तपत्रे व दूरदर्शनच्या माध्यमातून निदर्शनास पडतात. या पत्राद्वारे आम्ही आपणास नम्रपणे आवाहन करू इच्छितो , की आपण स्वत: आवर्जून वेळ काढून आमच्या वसतिगृहांना भेट द्यावी व तेथील सुविधांची समक्ष खात्री करून घ्यावी. आपण असे केल्यास आपल्या पाल्याची अन्यत्र राहण्याची व्यवस्था करण्याऐवजी संस्थेच्या वसतिगृहातच त्याचा प्रवेश घेण्यास आपण अग्रक्रमाने प्राधान्य द्याल, अशी आम्हाला खात्री आहे.

आपल्या पाल्याच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी व त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण निश्चितच सकारात्मक निर्णय घ्याल असा आम्हास विश्वास आहे.

शुभेच्छुक

**प्राचार्य**

**अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर**